मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ । पान १

# राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसला धक्का?

## राजकीय रस्सीखेच: भाजपाचा चौथा उमेदवार रिंगणात उतरणार!

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील राज्यसभेच्या सहा जागांसाठी २७ फेब्रुवारीला होणाऱ्या मतदानात राज्यातील राजकारणाला नवी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. जून २०२२ ला झालेल्या विधान परिषद निवडणुकीनंतर शिवसेनेत मोठी फूट पडून राज्यातील सरकार पडले होते. आता पुन्हा राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी असून, भाजपने चौथा उमेदवार दिल्यास त्यांचा उमेदवार विजयी होईल असा दावा केला जात आहे. त्यामुळे काँग्रेसला धक्का बसण्याची शक्यता अधिक आहे. राज्यसभेच्या सहा जागांपैकी आमदारांची संख्या पाहता भाजपच्या तीन, राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना व काँग्रेस यांची प्रत्येकी एक जागा निवडून येऊ शकते. मात्र, भाजप तीनऐवजी चार उमेदवार देण्याची शक्यता आहे. हा उमेदवार निवडून यायचा असेल तर त्यास काँग्रेस पक्षाची मते मिळणे आवश्यक आहे. मात्र, राज्यसभेचे मतदान हे पक्षाच्या निवडणूक प्रतिनिधीला दाखवून करावे लागते. यात बजावलेल्या व्हीपच्या विपरित काही घडल्यास पक्ष संबंधित आमदाराचे सदस्यत्व रद्द करण्याची कारवाईही करू शकतो. मात्र, सध्या भाजपचा वाढलेला दरारा आणि राज्यातील अनेक नेत्यांची भाजप व त्याच्या मित्र



पक्षांच्या दिशेने सुरू झालेली वारी पाहाता काँग्रेसमधील काही आमदार ही हिंमत करू शकतील, असा कयास राजकीय क्षेत्रात लावला जात आहे. जून २०२२ला झालेल्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसच्या चंद्रकांत हंडोरे यांना काँग्रेसची मते फुटल्याने पराभव पत्करावा लागला होता. काँग्रेसची किमान सात मते फुटल्याचे त्यावेळी स्पष्ट झाले होते. या संपूर्ण प्रकाराच्या चौकशीसाठी मोहन प्रकाश समितीही नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने आपला अहवाल दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे दिला होता. मात्र ज्या आमदारांवर संशय होता, त्यातील कुणावर कारवाई तर सोडाच, त्यांना खासगीतही जाब विचारण्याची हिंमत ना राज्यातील पक्ष नेतृत्वात होती ना दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे. त्यामुळे नियमाच्या बागुलबुवाचा परिणाम होण्याची शक्यता कमी असल्याचे काँग्रेसचे नेते खासगीत मान्य करतात. त्यामुळे राज्यसभा निवडणुकीबाबत दिल्ली हायकमांडलाही याची कल्पना देण्यात आली असून, याबाबत नक्की कोणती रणनीती आखायची, याचा हायकमांड विचार करीत असल्याचे काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले.

### व्हीप कुणाचा चालणार?

» शरद पवार गटाकडे नऊ आमदार असून, शिवसेना 'उबाठा'कडे १५ आमदार आहेत. या आमदारांवर व्हीप कुणाचा चालणार, हा प्रश्न आहे. शिवसेना 'उबाठा' पक्षाने या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. त्याचा निकाल काय येतो, यावर बरेच काही अवलंबून राहील. व्हीप कुणाचा मान्य करायचा, याचा निर्णय घेण्यास विलंब झाला किंवा हा अधिकार विधानसभा अध्यक्षांकडे गेल्यास चौथा उमेदवार रिंगणात येणार, हे नक्की असल्याचे एका ज्येष्ठ नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# इंटरनेट केबलवाल्यांच्या भल्यासाठीच टॉवरचा मार्ग मोकळा होईना

## मोशी प्राधिकरणात मोबाईल नॉट रिचेबल; नागरिक त्रस्त

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्राधिकरणामध्ये सेक्टर ९, ६ आणि ४ मध्ये मोबाईल नेटवर्कची मोठी समस्या असून, त्यावर अजून तोडगा काढलेला नाही. विद्यार्थी, वर्कफॉर्म होम कर्मचारी, नोकरदारवर्ग यांना मोठी समस्या येते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. इंटरनेट केबल व्यावसायिकांच्या हितासाठी तसेच आर्थिक हितसंबध असल्यामुळेच मोबाईल टॉवर आतापर्यंत उभारले नसावे असा सूर नागरिकांमधून येतो आहे. सध्याच्या स्थितीला मोबाईल हे महत्त्वाचे संपर्काचे साधन झाले आहे. यावरून अनेकांची काम घरबसल्या होत आहेत. मोशी प्राधिकरणाचा परिसर असूनही मोबाईल नॉट रिचेबल ची समस्या येते आहे. परिसरात वायफाय (इंटरनेट) केबलवाल्यांची चांगलची चलती आहे. प्रत्येकाला इंटरनेटचा प्लॅन घ्यावाच लागतो. त्याशिवाय मोबाईल वापरणे अशक्य होते. राजकारण्यांची इच्छाशक्ती असती, तर आतापर्यंत महापालिकेकडून दीड ते दोन गुंठे जागा मिळवून मोबाईल टॉवर उभारून अनेकांची समस्या मार्गी लागली असती. मात्र राजकाण्यांची इच्छाशक्ती नसल्यामुळे आतापर्यंत मोबाईल टॉवर उभारण्यात आला नसावा अशी खंत



परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



" मोबाईल नेटवर्क समस्येमुळे पर्यायी व्यवस्था म्हणून वायफाय घेतले जाते. त्याचा परिणाम म्हणजे अनेक इमारतींवर केबलच्या वायरचे जाळे परिसरात विखूरलेले दिसते आहे. हे धोकादायक जाळे थांबवायचे असेल, तर मोबाईल टॉवर झाले पाहिजे. नेटवर्कच्या समस्येमुळे परिसरातील अनेकांना समस्यांना सामोरे जावे लागते.

**-आनंद सिंघवी,** लक्षव्दिप सोसायटी



" इंद्रायणीनगर, मोशी प्राधिकरण परिसरात आतापर्यंत विविध कामांसाठी करोडो रुपये खर्च केले असतील. मात्र महापालिकेकडून दीड ते दोन गुंठे जागा उपलब्ध करून मोबाईल टॉवर उभा करता आला असता. मात्र इच्छाशक्तीच्या अभावामुळेच आतापर्यंत मोबाईल टॉवर उभारलेला नाही. सत्ताधाऱ्यांनी मनात आणले तर हा प्रश्न तत्काळ मार्गी लागू शकतो.

**-तुषार सहाणे,** सामाजिक कार्यकर्ते



" नेटवर्क नसल्यामुळे महत्त्वाचे कॉल मिस व्हायचे. कंपनीत गेल्यानंतर फोन आल्यावर अनेकजनांचा प्रश्न असायचा खूप वेळापासून फोन करतोय लागत नाही. या समस्येपासून सूटका करण्यासाठी वायफाय घेतले. सध्या इंटरनेटवरून वायफाय कॉलिंग चा वापर करतो. मोबाईल टॉवर नसल्यामुळे परिसरातील इमारतींवर केबलचे जाळे पसरलेले पाहायला मिळते. माझ्या सोयाटीतील इमारतींवर मकडी जाळे विणते त्या पध्दतीने इंटरनेट केबलचे जाळे विणले आहे. लहान मुलांना टेरेसवर जावून खेळता येत नाही. त्यामुळे मोबाईल टॉवर होणे आवश्यक आहे.

**- विशाल पाटील,** नागरिक हॅपीहोम सोसायटी

# अयोध्येतील राममंदिराची संकल्पपूर्ती, काशी, मथुरेतही मंदिर उभारणीचा निर्धार : जोशी

## सरसंघचालकांकडून विनायक थोरातांचे अभिष्टचिंतन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** हजारो वर्षांच्या परिस्थितीनंतर देश बदलतोय, त्याची अनुभुती आपल्याला येतेय. जय श्रीरामचा नारा दिला जातोय. श्रीराम लल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त २२ जानेवारीपासून देशभरात भक्तीची लाट आली आहे, ती यापुढेही कायम रहावी. अयोध्येत श्रीराम लल्लाचं मंदिर झालं. अद्याप काशी आणि मथुरेचं मंदिर व्हायचं आहे. याच मार्गाने पुढे जात काशी मथुरेतही मंदिर उभारणीचा आमचा संकल्प आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारी मंडळाचे सदस्य भैय्याजी जोशी यांनी चिंचवड येथे बोलताना व्यक्त केले. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य विनायकराव थोरात यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त सोमवारी चिंचवड नाट्यगृहात त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा झाला. भैय्याजी जोशी आणि संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते थोरात यांचा सत्कार करण्यात आला. प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडगावकर, प्रांत प्रचारक यशोधन वाळिंबे, कमल थोरात, कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अमोल थोरात व थोरात परिवाराच्या आप्तेंष्टासह संघाचे पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकारी, स्वयंसेवक व विविध



क्षेत्रातील मान्यवर या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालपणापासून संघकार्यात झोकून देत समर्पित भावनेने काम केले. त्यांच्यासारखे हजारो स्वयंसेवक आणि राष्ट्रभक्तांच्या कार्यामुळे आज देश बदलत आहे. मंदिर वही बनायेंगेचा नारा देत राम भक्तांनी बाबरी ढाचा हटवला. पाचशे वर्ष हृदयाला टोचणारा काटा दूर करून आदर्शवत प्रेरणास्थान निर्माण केले. देशात मंदिरांची कमतरता नाही. मात्र, अयोध्येतील श्रीराम मंदिर हे सर्वार्थाने राष्ट्र मंदिर आहे. समाजाचा सामूहिक आनंद, सामूहिक शक्ती निर्माण करण्याच्या प्रयत्नाचा तो एक भाग आहे. त्या माध्यमातून देशाचं सातवं सोनेरी पान लिहिण्याचं भाग्य तुम्हा-आम्हाला मिळालं आहे. संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीत विनायकरावांसारखे लाखो स्वयंसेवक संघाने घडविले. त्यामुळेच हिंदू राष्ट्र उभारणीत संघाचे आणि स्वयंसेवकांचे मोठे योगदान आहे. नानासाहेब जाधव म्हणाले की, शांतपणे, ध्येय ठेवून काम करणे, व्रत म्हणून काम करणे हे विनायकराव थोरात यांचे वैशिष्ट्य आहे. देशी गायीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी संघाकडून विश्वमंगल गोग्राम यात्रा काढण्यात आली. त्यात विनायकरावांचे मोठे योगदान राहिले. कार्यक्रमाचे प्रास्तविक अमोल थोरात यांनी केले. सूत्रसंचालन महेश देशपांडे यांनी केले. कावेरी मापारी यांनी आभार मानले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सोमवारी दुपारी थोरात यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन केले. तासभर चाललेल्या या कौटुंबिक समारंभात विनायकराव थोरात व त्यांच्या पत्नी कमल थोरात यांचा भागवतांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी भागवत यांनी अमोल थोरात यांच्यासह संपूर्ण थोरात कुटुंबियांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. चिमुरड्यांमध्ये ते रमून गेले. मुलांना त्यांनी खाऊचे वाटप केले. त्यांच्याशी बराच वेळ गप्पा मारल्या. मुले टीव्ही आणि मोबाइलपासून दूर आहेत, असे त्यांना समजले, तेव्हा त्यांनी समाधान व्यक्त केले.

# चारचाकींसाठी लवकरच 'एलजे' ही नवीन मालिका

## आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** चारचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या 'एलजे' या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे लवकरच चारचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. ज्यांना खाजगी चारचाकी वाहनांसाठी आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक विहित शुल्क भरुन हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयाच्या परिवहन विभागात पत्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः




जमा करणे आवश्यक राहील. चारचाकी वाहन क्रमांकाची यादी ८ फेब्रुवारी रोजी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात आल्यानंतर अर्जदारांनी लिलावासाठी जास्त रक्कमेचा एकच डीडी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात घालून जमा करावा. डीडी 'डीवाय. आर.टी.ओ. पिंपरी-चिंचवड'या नावाने राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष सादर केलेल्या अर्जदारास पसंती क्रमांक वितरीत केला जाईल. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेले शुल्क शासनाच्या तिजोरीत जमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही. आकर्षक क्रमांकाचे शुल्क बदल झाल्यास त्यावेळी विहीत करण्यात आलेले शुल्क लागू राहील, असेही पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# ठाकरेंनी मला मंत्रीपद दिलं नाही!

## कमी पैसे दिले म्हणून मंत्री पद मिळू शकले नाही : केसरकर

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मातोश्रीमधून माझ्याकडे मंत्री पदासाठी कोट्यावधी रुपयांची मागणी करण्यात आली होती मात्र मी एक कोटी रुपये दिले. कमी पैसे दिले म्हणून मला मंत्री पद मिळू शकले नाही असा गौप्यस्फोट राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत केला. सावंतवाडी येथील पत्रकार परिषदेत त्यांनी हा गौप्यस्फोट केला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सावंतवाडी येथील संवाद कार्यक्रमात केलेल्या आरोपांचे खंडन करत केसरकर म्हणाले, ५० कोटीच काय एक रुपया जरी घेतला असल्याचे सिद्ध केल्यास तर राजीनामा देईन असे सांगितले. मंत्री पद देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे



कोट्यावधी रुपयांची मागणी केली होती, मात्र एकनाथ शिंदे यांनी एक रुपया न घेता मंत्रीपद दिले असल्याचा गौप्यस्फोट केसरकर यांनी केला. मी अनेक पक्ष नेत्यांसोबत काम केले आहे, उद्धव ठाकरे यांचा मी मान ठेवला होता मात्र त्यांनी माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या विरोधात आरोप केले. साईबाबांच्या श्रद्धा, सबुरी बद्दल ते बोलले हे चुकीचे असल्याचे केसरकर यावेळी म्हणाले.


नारायण राणे हे सिंधुदुर्ग वासियांसाठी देव होते. त्यावेळी तुमच्या गाडीत भरायला पेट्रोल आणि राहण्यासाठी हॉटेल मिळत नव्हते तर श्याम सावंत सोडले तर त्यांच्यासोबत गेलेले सर्व आमदार त्यांनी पुन्हा निवडून आणले आणि त्यांच्यावर तुम्ही टीका करता हे चूकीचे असल्याचेही ते म्हणाले.नारायण राणे हे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष एक नंबरला होता तर दोन नंबरला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि तीन नंबरला शिवसेना होती या शिवसेनेकडे चाळीस हजार मते होती मात्र हे मताधिक्य आपण एक लाख वीस हजार पर्यंत आणले यामध्ये खारीपेक्षाही मोठा वाटा माझा होता हे त्यांनी कबूल करावे .तुमचे आमदार खासदार निवडून आणण्यासाठी माझा जास्त वाटा असल्याचे ते म्हणाले. आमदार गणपत गायकवाड यांनी केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या मुख्यमंत्र्यावरील रकमेबाबत बोलताना ते म्हणाले जर कोट्यावधी रुपये दिले होते तर ते यापूर्वी गणपत गायकवाड यांनी का मागितले नाही. जेव्हा त्यांना अटक झाली तेव्हा हे बिनबुडाचे आरोप केले जात असून यात काही तथ्य नसल्याचे ते म्हणाले. उद्धव ठाकरे हे माझ्यासारख्या सज्जन माणसाच्या अंगावर जात असून हे येथील जनता कधीही सहन करणार नाही. त्याचबरोबर कोकणातील दौऱ्यामध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नाव घेऊन त्यांचा अवमान करत आहेत.

तुम्ही घेतलेले निर्णय शरद पवार यांच्या सांगण्यावरून घेतले त्यामुळे तुमच्यावर ही वेळ आली असल्याचे केसरकर म्हणाले. माझी लढाई नारायण राणे यांच्याशी व्यक्तिगत नसल्यामुळे आमचे दोघांचे एकमेकांशी जुळले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सावंतवाडी येथील संवाद कार्यक्रमात केलेल्या आरोपांचे खंडन करत केसरकर म्हणाले, ५० कोटीच काय एक रुपया जरी घेतला असल्याचे सिद्ध केल्यास तर राजीनामा देईन असे सांगितले. मंत्री पद देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे कोट्यावधी रुपयांची मागणी केली होती, मात्र एकनाथ शिंदे यांनी एक रुपया न घेता मंत्रीपद दिले असल्याचा गौप्यस्फोट केसरकर यांनी केला. मी अनेक पक्ष नेत्यांसोबत काम केले आहे, उद्धव ठाकरे यांचा मी मान ठेवला होता मात्र त्यांनी माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या विरोधात आरोप केले. साईबाबांच्या श्रद्धा, सबुरी बद्दल ते बोलले हे चुकीचे असल्याचे केसरकर यावेळी म्हणाले.

# शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना

## शासकीय गुपिते कायदा १९२३ मध्ये राज्य शासनाने अंशतः बदल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सातारा जिल्हा नियोजन समितीमार्फत ाज्य शासनाकडे कोयना धरण परिसरातील मुनावळे या गावी जलपर्यटन विकसित करण्याचा प्रस्ताव सन २०२२ मध्ये पाठविण्यात आला होता. त्याला राज्य शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिली होती. या प्रकल्पाचे बांधकाम हे कृष्णा खोरे विकास महामंडळाद्वारे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, तर हा प्रकल्प एमटीडीसी चालविणार आहे. पर्यावरणाची हानी होणार नाही, तसेच जल पर्यटन श्रेत्रात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच पर्यावरणस्नेही बोटींचा वापर करण्यात यावा, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. पर्यटकांसाठी नियमानुसार आवश्यक त्या विमा सवलती आणि वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.याबाबतचा शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे उपसचिव



संतोष रोकडे यांनी प्रसृत केला. कोयना धरण किंवा शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासकीय गुपिते कायदा १९२३ मध्ये राज्य शासनाने अंशतः बदल केला आहे. या सुधारणेमुळे धरण आणि आजूबाजूच्या सात कि.मीपर्यंतच्या क्षेत्राला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून अबाधित ठेवून उर्वरित जलाशयाचा ८० कि.मीचा परिसर पर्यटनदृष्ट्या विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून जावळी तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन विकसित करण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्यासाठी ४५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. कोयना धरण परिसरात जंगले, सह्याद्री डोंगररांगा, निळेशार पाणी असे निसर्गाचे वरदान लाभलेले आहे. शिवसागर जलाशयात जलपर्यटन विकसित करण्यासाठी मोठी संधी आहे. त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगार संधी निर्माण होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्था विकसित होऊ शकणार आहे. तसेच पर्यावरणस्नेही बोटींचा वापर करण्यात यावा, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. पर्यटकांसाठी नियमानुसार आवश्यक त्या विमा सवलती आणि वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.याबाबतचा शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे उपसचिव संतोष रोकडे यांनी प्रसृत केला.

# तलाठी भरती परीक्षेतील उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी

## ही प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील बहुचर्चित तलाठी परीक्षेतील उमेदवारांची निवड आणि प्रतीक्षायादी गेल्या महिन्यात भूमी अभिलेख विभागाकडून जाहीर करण्यात आली. त्यानुसार १ फेब्रुवारीपासून निवड यादीतील उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, कागदपत्रे, चारित्र्य पडताळणी सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर संबंधित उमेदवारांना तलाठी पदाची नियुक्तिपत्रे वाटप होणार आहेत. तलाठी भरती परीक्षेची गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात आली आणि भरतीचा पुढील टप्पा म्हणून २३ जानेवारी रोजी रात्री उशिरा राज्यातील २३ जिल्ह्यांमधील निवड आणि प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली. या याद्या संबंधित जिल्ह्यातील जिल्हा निवड समितीने तयार केल्या आहेत. उर्वरित आदिवासीबहुल १३ जिल्ह्यांमधील निवड यादी तयार करण्याचे काम संबंधित जिल्ह्यातील जिल्हा निवड समित्यांमार्फत सामान्य प्रशासन विभागाच्या पुढील आदेशानंतर करण्यात येणार आहे.याबाबत प्रभारी अपर जमाबंदी आयुक्त सरिता नरके म्हणाल्या, 'वैद्यकीय तपासणी, कागदपत्रे पडताळणी, चारित्र्य पडताळणी आदी प्रक्रिया सुरू आहे. कागदपत्रे पडताळणीत उभे आणि समांतर आरक्षण असे दोन भाग केले आहेत. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे असतात, ती कागदपत्रे तपासण्यात येत आहेत. परीक्षेला जाताना उमेदवारांनी जो अंगठा यंत्रावर दिला आहे, निवड झालेल्या उमेदवाराचा आणखी एकदा अंगठा घेऊन परीक्षेला बसलेला आणि निवड झालेला उमेदवार तोच आहे किंवा कसे, हे तपासण्यात येणार आहे. ही प्रक्रिया १ फेब्रुवारीपासून सुरू केली असून १५ फेब्रुवारीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया जिल्हा निवड तपासणी समितीकडून करण्यात येत आहे. या प्रक्रियेत एखादा निवड झालेला उमेदवार गळाल्यास तातडीने प्रतीक्षा यादीतील उमेदवाराला निवड समिती पाचारण करणार आहे.'




### १५ फेब्रुवारीनंतर नियुक्तीपत्र

» वेळापत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रक्रियेचे वेळापत्रक संबंधित जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. १५ फेब्रुवारीनंतर नियुक्त्या मिळतील. ज्या जिल्ह्यांत १००-१२५ च्या आसपास उमेदवारांची तपासणी प्रक्रिया करायची आहे, त्या ठिकाणी दहा-बारा दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल. १५०-२०० च्या आसपास उमेदवार असलेल्या जिल्ह्यात थोडा जास्त कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही प्रभारी अपर जमाबंदी आयुक्त नरके यांनी सांगितले.

# आरटीओच्या ऑनलाइन सेवेला 'एनआयसी'चा खो

## सर्व्हर बदलण्याचे काम सुरू असल्याने सारथी प्रणाली दिवसभर बंद

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) ऑनलाइन यंत्रणा मंगळवारी बंद राहिली. राष्ट्रीय सूचना केंद्राकडून (एनआयसी) सर्व्हर बदलण्याचे काम सुरू असल्याने सारथी प्रणाली दिवसभर बंद राहिली. त्यामुळे परवान्याशी निगडित सेवा नागरिकांना मिळू शकली नाही. मागील आठवड्यापासून सेवेत अडथळे येत असूनही याबाबत आरटीओकडून पूर्वसूचना मिळत नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. राष्ट्रीय सूचना केंद्राकडून सर्व्हर बदलण्याचे काम मागील आठवड्यापासून सुरू आहे. त्यामुळे देशभरातील आरटीओमधील सारथी प्रणाली बंद पडत आहे. या आठवड्यात मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी एनआयसीने सर्व्हरमधील बिघाडाच्या नावाखाली ही प्रणाली बंद ठेवली.




आरटीओमधील अनेक सेवा नागरिकांना ऑनलाइन मिळतात. त्यातील वाहन चालविण्याचा शिकाऊ परवाना, परवान्याचे नूतनीकरण, परवान्यावरील पत्ता बदलणे, बनावट परवाना काढणे यासह परवान्याशी निगडित ऑनलाइन सेवा बंद झाल्या. ऑनलाइन प्रणाली बंद झाल्याने नागरिकांना सेवा मिळण्यात अडचणी आल्या.मागील आठवड्यात सर्व्हर बदण्याच्या कामामुळे १ व २ फेब्रुवारीला सारथी प्रणाली बंद होती. त्यानंतर ३ आणि ४ फेब्रुवारीला आरटीओला सुटी होती. या दोन दिवसांत एनआयसीने सर्व्हर बदलण्याचे काम पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु, एनआयसीकडून सर्व्हर बदलण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे पुन्हा नागरिकांची मोठी गैरसोय झाली. याबद्दल अनेक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एनआयसीकडून सर्व्हर बदलण्याचे काम सुरू आहे. एनआयसीच्या जुन्या सर्व्हरमध्ये देशातील ३० कोटी वाहनचालकांची विदा आहे. त्यात महाराष्ट्रातील ३ कोटी वाहनचालकांच्या विदेचा समावेश आहे. जुन्या सर्व्हरमधून नवीन सर्व्हरमध्ये ही विदा घेण्याचे काम सुरू आहे. यामुळे अनेकवेळा सर्व्हरवर ताण येऊन बिघाड होत आहे. यामुळे सारथी प्रणाली बंद पडत आहे.

> **“राष्ट्रीय सूचना केंद्राकडून आरटीओतील ऑनलाइन प्रणालीची सेवा दिली जाते. त्यांच्या सर्व्हरमध्ये दुरुस्ती सुरू असल्याने देशभरातील आरटीओमधील ऑनलाइन सारथी प्रणाली बंद आहे. परवान्याशी निगडित ऑनलाइन सेवा वगळता आरटीओच्या इतर सेवा सुरू आहेत.**
> **— संदेश चव्हाण, उपायुक्त, परिवहन विभाग**